॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड   Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

| Phone: (02462) 229242<br>FAX No. (02462) 229574 | | E-mail: approval@srtmun.ac.in<br>website: srtmun.ac.in |
|---|---|---|

जावक क्र.शैक्षणिक/मान्यता/०२/२०२३–२४/४६७          दिनांक :०७/०९/२०२३

### परिपत्रक

विषय : दिनांक १४ जून २००६ पूर्वी विहित निवड पध्दतीने नियुक्त झालेल्या व विद्यापीठाने नियमित मान्यता मिळालेल्या एम.फील अर्हताधारक अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठी माहिती सादर करण्यासाठी मुदतवाढ बाबत..

संदर्भ : शैक्षणिक/मान्यता/०२/२०२३–२४/१८९. दि. ३१/०७/२०२३.

उपरोक्त विषयी व संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दि. १४ जून, २००६ पुर्वी एम.फील अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्त झालेल्या व ज्या अर्हताधारकांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे तसेच ज्यांनी सेवेत असतांना दि.०१ जानेवारी, १९९४ ते दि.११ जुलै, २००९ या कालावधीत एम.फील ही अर्हता धारण केली आहे, अशा अध्यापकांना नेट अर्हतेमधून सूट मिळण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्याच्या अनुषंगाने माहिती दि. २६/०८/२०२३ पर्यंत सादर करण्याबाबत कळविले होते.

काही महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नेट मधुन सूट मिळविण्यासाठी शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठात दाखल करण्याकरिता मुदतवाढ देणे बाबत विनंती केली आहे. मा. प्र–कुलगुरू महोदयांनी मुदतवाढ देणे बाबतची विनंती मान्य केली असून नेट मधुन सुट मिळण्यासाठी शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करण्याचा अंतीम दिनांक १५/०९/२०२३ असा करण्यात आला आहे. याची सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन विहित कालावधीतच प्रस्ताव सादर करावे, या तारखेनंतर प्रस्ताव सादर केल्या नंतर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सदरील परिपत्रक महाविद्यालयातील सर्व संबंधित अध्यापकांच्या निदर्शनास आणून देण्यात येवून, उक्त अध्यापकांचा प्रस्ताव संपुर्ण दस्ताऐवजासह प्राचार्यांनी साक्षांकित करून विहित वेळेत या कार्यालयास सादर करावा.

ज्ञानतिर्थ विष्णूपुरी, §
नांदेड–४३१ ६०६ §
जावक क्र.शैक्षणिक/मान्यता/एम.फील/ §
२०२३–२४/४६७ §
दिनांक: ०७ सप्टेंबर, २०२३ §

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत:

१) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. प्र–कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड.
५) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.